पुण्यनगरी ३ । गुरुवार, ७ ऑगस्ट २०२५

# मौनातल्या भावनांना शब्दांत व्यक्त करा : प्रा. राजा माळगी

## विवेकानंद कॉलेजमध्ये 'वाङ्मय मंडळा'चे उद्घाटन

कोल्हापूर : साहित्य हे नवनवीन उन्मेष धारण करणारे असते. मौनातल्या भावनांना शब्दांत व्यक्त करून लिहिते व्हा, असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक व व्याख्याते प्रा. राजा माळगी यांनी केले. विवेकानंद कॉलेजमधील वाङ्मय मंडळ आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. कार्यक्रमास आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रा. माळगी म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजामधील अज्ञानाचा अंधकार दूर केला आहे. माणसाला व्यक्त होता आले पाहिजे. डार्विनने सांगितलेल्या उत्क्रांतीच्या सिद्धांताप्रमाणे माणसाचा मेंदू नष्ट होईल. साहित्यिक होणे सोपे आहे. त्यासाठी फक्त शब्दांशी खेळता आले पाहिजे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात रोपास पाणी घालून आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने झाली. प्रास्ताविक व स्वागत वाङ्मय मंडळाचे प्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रदीप पाटील यांनी करून दिला. आभार डॉ. कविता तिवडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. कार्यक्रमास डॉ. दीपक तुपे, डॉ. स्नेहा देसाई, प्रा. रोहिणी रेळेकर, प्रा. अश्विनी खवळे, प्रा. आर्या कुलकर्णी आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी

दि. ०७.०८.२०२५

सकाळ



# सस्नेह निमंत्रण



।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार ।।

-शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

## शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचा ३८ वा स्मृतिदिन

38 वा स्मृतिदिन

**कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा.प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे**

**प्रमुख पाहुणे :मा.ना.पंकज भोयर साहेब**

( राज्यमंत्री,शालेय शिक्षण,गृह (ग्रामीण),सहकार,खनिकर्म,गृहनिर्माण)

**प्रमुख वक्ते : श्री. अविनाश भारती**

( सुप्रसिध्द कवी व व्याख्याते)

**विषय :**

**आजची संस्कृती व डॉ. बापूजी साळुंखे यांची विचारधारा**

**निमंत्रक : प्राचार्या सौ.शुभांगी गावडे**

(सचिवा,श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर)

या प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके वितरीत केली जाणार आहेत.

**कार्यक्रम वेळ :** शुक्रवार, दिनांक ८ ऑगस्ट, सकाळी १० .३० वाजता

**कार्यक्रम स्थळ : शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे स्मृतिभवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर**

तरुण भारत संवाद
गुरूवार, ७ ऑगस्ट २०२५

# दोन्ही किडन्या फेल झालेल्या प्राजक्ताला हवा मदतीचा हात

**कोल्हापूर :** वडिल किडनी देणार होते, मात्र दोन महिन्यापूर्वी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबरोबर तिची किडनीची अपेक्षाही संपली. दोन्हीही किडन्या फेल आहेत. आता जगण्यासाठी आठवड्यातून तीन वेळा डायलेसीस करायचाच खर्च आहे. सरनोबतवाडी मणेरमळा (ता.करवीर) येथील प्राजक्ता किशोर गायकवाड हिला गरज आहे आर्थिक मदतीची.

गायकवाड विवेकानंद महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत आहे. तीन वर्षापासून तिला त्रास होऊ लागला. वैद्यकीय तपासणीत तिच्या दोन्ही किडन्या फेल असल्याचे निदर्शनात आले. दोन्ही किडन्या फेल झाल्याने जगणे तिला अवघड झाले आहे. महिन्यातून तीन वेळा तिला डायलेसीस करावे लागत आहे. तिच्या मागे घरकाम करणारी आई, एक भाऊ, बहिण आहेत.

**दानशुरांना मदतीचे आवाहन**

तिच्या मदतीसाठी दि जळगाव पिपल्स को. ऑ. बॅंक लि या बॅंकेच्या ३८०५०००००७८५ (आयएफएससी jpcb0000038) या प्राजक्ता किशोर गायकवाड या नावावर पैसे जमा करण्याचे आवाहन तिने केले आहे.

**ऋतूराज पाटील यांची मदत**

माजी आमदार ऋतूराज पाटील यांनी गायकवाड हिच्या वैद्यकीय खर्चाची जबाबदारी घेतली आहे. डी. वाय. पाटील हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु आहेत. आई खासगी ठिकाणी काम करत आहे. उदरनिर्वाहबरोबर वैद्यकीय खर्चासाठी अजूनही तिला मदतीची गरज आहे. दानशुरांनी बॅंकेच्या खात्यावर किंवा ७७५६९४९०४३ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन प्राजक्ताने केले आहे.